# प्रेसनोट

जा.क्र. २४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१४/१४/२०१६.

पोलीस स्टेशन साकोली हद्दीतील मृतक ईश्वर नागोजी कोल्हे वय ४५ वर्ष रा.बोळदे ता.साकोली व आरोपी क्र. १ रामरतन राजीराम लाडे वय ४५ वर्ष २) सौ.मालता रामरतन लाडे वय ३८ वर्ष ३) सौ.मायाबाई रूपचंद लाडे वय ४० वर्ष ४) सौ.सुलोचना रामकृष्ण लाडे वय ४२ वर्ष सर्व रा. बोळदे ता. साकोली येथील राहणारे आहेत. घटणेच्या ६ महीण्या पुवी आरोपी रामरतन राजीराम लाळे वय ४५ वर्ष यांचे मुलाने मृतकचे मुलाचा मोटार सायकलने अपघात केला होता या कारणा वरून घटना दि. १४/०४/२०१४ रोजी २१.०० वा. चे सुमारास वर नमुद आरोपीतांनी संगणमत करून मृतक ईश्वर नागोजी कोल्हे वय रा. बोळदे यास लोखंडी रॉड, काठया व लाथा बुक्याने मारहाण करून जिवानाशी ठार मारल्याने फिर्यादी मृतकचा मृलगा अमित ईश्वर कोल्हे यांचे रिपोर्ट वरून पोस्टे साकोली अप क्र. ४८/२०१४ कलम ३०२,३४ भादवी अन्वये दि.१८/०४/२०१४ ला ००.१५ वा. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा प्रथम तपास स.पो.नी गणेश खंडाते पो.स्टे साकोली यांनी केला व वेळीच गुन्हयाचा तपास श्री हिम्मत जाधव उपवीभागीय पोलीस अधीकारी साकोली यांनी स्व:ता कडे घेवुन गुन्हयाचा बारकाईने तपास करून पुरावा गोळा करून आरोपीता विरूध्द दोषारोप पत्र क्र.५२/२०१६ दि.१५/०७/२०१४ प्रमाणे तंयार करून मा.प्रथम श्रेणी न्यायदंडाधीकारी साकोली यांचे कोर्टात दाखल केले होते.

सदर प्रकरण मा. जिल्हा सत्र न्यायालय भंडारा येथे वर्ग करण्यात आले होते.सदर प्रकरण मा.श्री एच.बी गायकवाड जिल्हा सत्र न्यायालय भंडारा –२ भंडारा यांचे न्यायालयात चालविण्यात आले असता मा. न्यालयाने साक्ष पुराव्या वरून दि. २४/१०/२०१६ ला चारही आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी २०००/रू दंड या प्रमाणे सजा सुनावली आहे.

आरोपी क्र. १) रामरतन राजीराम लाडे वय ४५ वर्ष २) सौ.मालता रामरतन लाडे वय ३८ वर्ष रा. बोळदे यांचे तर्फे ॲड खापर्डे व आरोपी क्र. ३ ) सौ. माया रूपचंद लाडे वय ४० वर्ष ४) सौ.सुलोचना रामकृष्ण लाडे वय ४२ वर्ष रा. बोळदे यांचे वतनी ॲड दिलीप भोयर यांनी काम पाहीले तर सरकारी तर्फे ॲड विश्वास तवले यांनी काम पाहीले.

गुन्हयातील आरोपी क्र.१) रामरतन राजीराम लाडे हा अटक तारीख १८/०४/२०१४ पासुन ते २४/१०/२०१६ पर्यत जिल्हा मध्यवर्ती कारागृह भंडारा येथे आहे हे विशेष.

( बी.आर.आडे)
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.